# मा. अति. सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, कंधार जि. नांदेड

**सत्र खटला क्रमांक ३९/२०२०**
**सरकार वि. विश्वनाथ**
निशाणी - २८

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी-**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव : नामदेव रामधन राठोड,**

**वय : ५३ वर्षे**

**व्यवसाय : नौकरी (पो.हे.कॉ.)**

**राहणार : पोलीस ठाणे, माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड**

**सरकारतर्फे सरतपासणी श्री.एम.बी.कागणे, सरकारी वकील यांच्यातर्फे :-**

**१.** मी दिनांक ०१.०२.२०१९ रोजी पोलीस ठाणे, कंधार येथे पो.हे.कॉ. म्हणुन नेमणुकीस होतो. दिनांक ०१.०२.२०१९ रोजी फिर्यादी मोमीन खदीर अहेमद मंजुर हा लाईनमन पोलीस ठाण्यात आला होता. त्याने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अंमलदार स.पो.उ.नि. श्री. कागणे यांनी गु.र.क्र.२७/२०१९ भा.दं.वि. कलम ३५३, ३२३, ५०४ अन्वये नोंदविला आणि त्याचा तपास माझ्याकडे दिला.

२. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान दिनांक ०२.०२.२०१९ रोजी फिर्यादीसह दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. सदरचा घटनास्थळ पंचनामा मला आता दाखविण्यात आला आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर दोन पंचांच्या सह्या आहेत. तसेच माझी देखील त्यावर सही आहे. त्यास निशाणी पी-१ देण्यात आलेली आहे. तसेच मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आहेत.

३. सुधीर देशमुख आणि शेषेराव सुंडगे यांचे जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले आहेत. सुधीर देशमुख यांच्या जबाबातील रेखांकित भाग-अ हा आता मी वाचुन पाहिला तो त्यांच्या सांगण्याप्रमाणेच मी नोंदविला आहे. त्यास निशाणी पी-५ देण्यात येते. तसेच शेषेराव सुंडगे यांच्या जबाबातील रेखांकित भाग-अ हा आता मी वाचुन पाहिला तो त्यांच्या सांगण्याप्रमाणेच मी नोंदविला आहे. त्यास निशाणी पी-६ देण्यात येते. तसेच मी फिर्यादीचा पुरवणी जबाब देखिल नोंदविला आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादीचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. सदरचे प्रमाणपत्र मी आता पाहिले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी पी-७ देण्यात येते. (डॉक्टरांना तपासल्याशिवाय हे वैद्यकिय प्रमाणपत्र पुराव्यात वाचता येणार नाही, असा आक्षेप श्री. कोळनुरकर यांनी नोंदविला आहे.) तसेच, फिर्यादी हा शासकीय कर्मचारी असल्यामुळे भा.दं.वि. कलम ३२३ ऐवजी ३३२ लावला.

४. भा.दं.वि. कलम ३५३ व ३३२ अन्वये दंडनीय अपराधाचे प्रकरण हे सत्र न्यायालयात चालणारे असल्यामुळे सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक श्री. विकास जाधव यांच्याकडे देण्यात आला. भा.दं.वि. कलम ३३२ लावण्याबाबतचे पत्र आता मी पाहिले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी पी-८ देण्यात येते. आरोपीला मी ओळखतो. आज रोजी तो न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.डी. कोळनूरकर-**

**५.** या गुन्ह्याची तक्रार दिनांक ०१.०२.२०१९ रोजी दाखल झाली होती. श्री. सुभाष व्यंकटराव नागरगोजे आणि श्री. नितीन निवृत्ती कदम हे दोघेही महावितरणचे कर्मचारी आहेत. महावितरणच्या कर्मचा-यांच्या संदर्भाने गुन्हा दाखल झाला आहे.

**६.** कंधार तालुक्याती कौठा ही एक मोठी व्यापारीपेठ आहे. कौठ्यापासुन बारुळ हे गाव जवळ आहे. बारुळ येथे शासनाचे विविध विभागाची कार्यालये आणि विश्रामगृह आहे. पंचनामा करण्यासाठी मी मुद्दामहुन इतर शासकिय किंवा अशासकिय साक्षीदार घेतलेला नाही, हे म्हणणे खरे नाही. मी कार्यालयात बसुन घटनास्थळ पंचनामा केला आहे, हे म्हणणे खरे नाही.

**७.** श्री. देशमुख आणि श्री. सुंडगे यांचे जबाब निशाणी **पी-६ व पी-७** हे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेले नाहीत, हे म्हणणे खरे नाही. फिर्यादी हा स्वत:च दवाखान्यात गेला होता, हे म्हणणे खरे नाही. ठाणे अंमलदारांनी त्याला पाठवले होते. तो एकटाच गेला होता. निशाणी **पी-७** वरिल खोटे वैद्यकिय प्रमाणपत्र डॉक्टरांकडुन हस्तगत केले आहे, हे म्हणणे खरे नाही.

८. भा.दं.वि. चे कलम ३५३ असताना सुरुवातीला ३३२ ऐवजी ३२३ का लावण्यात आला होता, याचे कारण मला सांगता येत नाही. या प्रकरणाचा तपास मी किती दिवस केला हे मला आठवत नाही. या प्रकरणाचा जवळपास तपास मी केला आहे. आरोपी विरुध्द कोणत्याही प्रकारचा पुरावा उपलब्ध नसताना देखिल मी खोटे आरोपपत्र तयार केले, हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**'श्रवणोत्तर स्वीकृत'**

Digitally signed by BALAJI UMAJIRAO CHOUDHARI
Date: 2026.03.31 13:32:52 +0530

( **बी. यु. चौधरी** )

दिनांक: ३१.०३.२०२६ अति. सत्र न्यायाधीश-१, कंधार